आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१७ डिसेंबर २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- एक देश एक निवडणूक संदर्भातली घटनादुरुस्ती विधेयकं लोकसभेत सादर
- विविध कामांसाठी लागणारं मुद्रांक शुल्क १०० रुपयांवरुन ५०० रुपये करण्याचं विधेयक विधानसभेत सादर
- विधान परिषदेच्या सभापतीपदाची निवडणूक येत्या गुरुवारी

**आणि**

- देशातल्या शेअर बाजारात मोठी घसरण, सेन्सेक्स १ हजारांहून अधिक अंकांनी घसरला

<><><><><>

एक देश एक निवडणूक संदर्भातली दोन विधेयकं आज लोकसभेत मांडण्यात आली. केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल विधेयक मांडत असताना विरोधकांनी विधेयक मांडण्यावर मतदानाची मागणी केली. त्यावर २६९ सदस्यांनी विधेयक मांडण्याच्या बाजूने कौल दिला. तर १९८ सदस्यांनी विधेयक मांडण्याला विरोध केला. त्यात काँग्रेस, समाजवादी पार्टी, द्रमुक, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, सीपीआय एम आणि इतर विरोधी खासदारांचा समावेश होता. ही विधेयकं म्हणजे संविधानाच्या मूलभूत ढाच्यावर हल्ला असल्याचं सांगत त्यांचा मसुदा आधी संयुक्त संसदीय समितीकडे तपासण्यासाठी पाठवावा अशी मागणी विरोधी पक्ष सदस्यांनी केली. विरोधकांचे आरोप खोडून काढताना अर्जुन राम मेघवाल यांनी देशाचे पहिले कायदेमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विधानाचा दाखला दिला.संविधानाचं संघराज्य स्वरुप कोणीही बदलू शकत नाही असं ते म्हणाले. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या नेतृत्वाखाली नेमलेल्या

उच्चस्तरीय समितीने एक देश एक निवडणूक संकल्पनेची अभ्यासपूर्ण तपासणी केली असून त्यात सर्व संबंधितांचं आणि तज्ज्ञांचं मत विचारात घेतलं आहे, असं मेघवाल म्हणाले. काँग्रेसचे मनिष तिवारी, तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी, आणि द्रमुकचे टी आर बालू यांनी आपल्या भाषणात या विधेयकाला विरोध केला.

**<><><><><>**

महाराष्ट्र मुद्रांक कायदा १९५८ मधे सुधारणा करणारं विधेयक मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत मांडलं. प्रतिज्ञापत्रं, करार, तसंच संबधित कागदपत्रांवर सध्या लागणारं १०० रुपयांचं मुद्रांक शुल्क १०० रुपयांवरून ५०० रुपये करण्याची तरतूद यात प्रस्तावित आहे. भागभांडवलावरच्या मुद्रांक शुल्कासाठी भांडवलाची मर्यादा ५० लाखावरून १ कोटी रुपये करण्याचा प्रस्ताव या विधेयकात आहे.

याबाबतचा अध्यादेश सरकारनं १४ ऑक्टोबरला काढला होता.

**<><><><><>**

विधानसभेत आजच्या दिवशीच्या कामकाजात राज्यात झाडं तोडण्याबाबतच्या नियम सुधारणा विधेयकावर चर्चा झाली. आमदार शेखर निकम आणि भास्कर जाधव यांनी वृक्षतोडीबाबत लागू असलेल्या कायद्यात वर्गीकरणानुसार दंड आकारला जावा, अशी मागणी केली.

त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याविषयीच्या कायद्याची माहिती सभागृहाला दिली. ते म्हणाले…

**होल्ड बाईट - देवेंद्र फडणवीस**

**<><><><><>**

विधान परिषदेच्या सभापतीपदाची निवडणूक येत्या १९ तारखेला होणार असल्याची घोषणा आज सभागृहात करण्यात आली. या निवडणुकीसाठी उद्या

म्हणजेच १८ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार आहेत.

<><><><><>

"मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजनेंतर्गत महिलांना देण्यात आलेली रक्कम अत्यंत कमी असून त्यात किती रुपयांची वाढ केली जाणार,  असा प्रश्न विधान परिषदेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आज केला. ते राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या चर्चेत बोलत होते.

राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न अत्यंत गंभीर झाला असून महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या करण्याच्या प्रमाणात मोठी वाढ झाली आहे, ग्रामीण भागात आरोग्य सेवा पोहचण्यात अनेक अडचणी निर्माण होत आहेत, प्राथमिक आरोग्य केंद्रांची कमतरता आणि औषध साठ्याचा अभाव आहे. मात्र या कशाचाही उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणात नाही, अशी टीका त्यांनी केली.

भाजपाचे सदस्य प्रवीण दरेकर यांनी चर्चेत भाग घेताना राज्यपालांच्या अभिभाषणाचं स्वागत केलं. राज्याला प्रगतीच्या मार्गावर नेण्यासाठी राज्य सरकार आणखी मजबुतीनं काम करेल, असं ते म्हणाले. तर, महायुती सरकारनं गेल्या अडीच वर्षात उल्लेखनीय कार्य केल्याचं प्रतिपादन शिवसेनेच्या मनीषा कायंदे यांनी केलं.

दरम्यान शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी मनिषा कायंदे यांची विधान परिषद मुख्य प्रतोदपदी नियुक्ती केली.

<><><><><>

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस विरोधी पक्षनेते असताना, आणि एकनाथ शिंदे तत्कालीन नगरविकास मंत्री असताना त्यांना अडकवण्याचा कट खोटे गुन्हे दाखल करून रचला गेला होता, असा आरोप आज विधानपरिषदेत, भाजपा गटनेते प्रविण दरेकर यांनी केला. त्यासंदर्भात पोलीस अधिकाऱ्यांच्या चर्चेची ऑडिओ क्लिप त्यांनी सभागृहात सादर केली. या प्रकरणाची एसआयटी, अर्थात विशेष तपास पथकामार्फत तात्काळ चौकशी करावी, अशी मागणी दरेकर यांनी केली.

<><><><><>

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज नागपुरात विधान भवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची भेट घेतली आणि महायुतीच्या विजयाबद्दल अभिनंदन केलं. सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये संवादाची या राज्याला दीर्घ परंपरा आहे. त्यांच्या नेतृत्त्वाखाली राज्याची आणखी प्रगती होईल, अशा शुभेच्छा दिल्याचं उद्धव ठाकरे यांनी या भेटीनंतर वार्ताहरांना सांगितलं. त्यानंतर ठाकरे यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भेट घेतली आणि अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. या भेटींमध्ये कुठलीही राजकीय चर्चा झाली नसल्याचं ठाकरे यांनी स्पष्ट केलं.

त्यापूर्वी वार्ताहर परिषदेत ठाकरे यांनी एक देश एक निवडणूक संकल्पनेला विरोध केला. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. ईव्हीएमच्या विरोधाला आणि मतपत्रिकांद्वारे मतदान घेण्याच्या मागणीचा त्यांनी पुनरुच्चार केला.

दरम्यान विरोधी पक्षनेत्यासंदर्भात कुठलाही प्रस्ताव मिळालेला नाही. तो प्रस्ताव आल्यावर संदर्भ तपासून निर्णय घेऊ असं नार्वेकर यांनी सांगितलं.

<><><><><>

नागपूरमधल्ये मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला चालना देण्यासाठी आशियाई विकास बँकेकडून १ हजार ५४७ कोटी रुपयांचं अर्थसहाय्य मिळणार आहे. विधानभवनातल्या मंत्रिमंडळ सभागृहात आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. या प्रकल्पामुळे नागपूर शहरासह परिसराच्या विकासाला आणखी गती मिळेल, असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. नागपूर मेट्रो प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी आशियाई विकास बँक आणि यूरोपीयन इन्वेस्टमेंट बँक यांच्याकडून एकूण ३ हजार ५८६ कोटी रुपयांचा वित्तपुरवठा करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय व्यापारातली मंदी आणि वाढती व्यापारी तूट यांच्या परिणामामुळे आज भारतीय शेअर बाजारांमध्ये तीव्र घसरण दिसून आली. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज दिवसअखेर १ हजार ६४  अंकांची घसरण झाली, आणि तो ८० हजार ६८४ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३३२ अंकांची घसरण नोंदवत २४ हजार ३३६ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

धुळे जिल्ह्यातल्या पळासनेर जंगलात पैशांचा पाऊस पाडण्याच्या वादातून गोळीबार करण्यात आला. याप्रकरणी धुळे पोलिस दलाच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा आणि शिरपूर तालुका पोलिसांनी मध्यप्रदेशमधल्या खंडवामधून चौघांना अटक केली आहे. जादूटोणा कायदा कलमान्वये तक्रारदारासह दोघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<><><><><>**

नवी मुंबईतल्या पनवेल नेरे इथं राहणा-या तिघांकडून 1 लाख 20 हजार रूपयांच्या  देशी बनावटीच्या  दोन देशी पिस्टलसह एक जिवंत काडतुस जप्त करण्यात आलं आहे.

<><><><>

राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी भामरागड तालुक्यातल्या नव्यानेच निर्माण करण्यात आलेल्या अतिसंवेदनशिल अशा पेनगुंडामधल्या पोलिस मदत केंद्र आणि लाहेरी उपपोलिस ठाण्याला आज भेट दिली.

<><><><>

जगभरातील संगीत रसिकांसाठी पर्वणी असलेला पुण्यातील मानाचा ७० वा सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सव उद्यापासून सुरू होत आहे. येत्या २२डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या या संगीत सोहळ्यामध्ये शास्त्रीय संगीतातील अनेक दिग्गज कलाकारांसह १५ नवीन कलाकार प्रथमच या मंचावर आपली कला सादर करणार आहेत.

<><><><>

पत्र लिहिणं ही एक कला असून बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगातही ही कला जोपासायला हवी, यातूनच पुढे उत्तम साहित्यिक घडतील, असं मत ज्येष्ठ लेखक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांनी आज मांडलं. मुंबईच्या पोस्ट कार्यालयानं आयोजित केलेल्या ‘पत्रोत्सव २०२४’ या कार्यक्रमात ते बोलत होते.

<><><><>

एम.पी.एस.सी. अर्थात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वर्ष  २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांचं  अंदाजित वेळापत्रक आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आलं आहे. उमेदवारांनी अधिक माहितीसाठी आयोगाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी असं आवाहन महाराष्ट्र लोकसेवा आयोगानं  प्रसिध्दीपत्रकाद्वारे केलं  आहे.

**<><><><><>**

मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी तर कोकण आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय घट झाली आहे. राज्यात सर्वात कमी किमान  तापमान अहमदनगर इथं ५ पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सियस इतकं नोंदवलं गेलं.

**//<><><><><>//**